Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.inE-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५

संदर्भ क्र./संलग्नता/टी-२/शा.टे./वि.प.प्र/ दि.

## -: परिपत्रक :- No - 1711 29 JUL 2024

प्रति,
मा.प्राचार्य / संचालक
सर्व संलग्नीत महाविद्यालय / संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय:- "मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या" अंमलबजावणी बाबत...
संदर्भ:- १) शासन निर्णय क्र. संकीर्ण - २०२४ / प्र.क्र.९० / व्यशि, दिनांक ०९/०७/२०२४ चे पत्र.
२) जा.क्र. ३४१ / जिकौविरोवउमाकेंको / मु.यु.का.प्र.योजना / २०७४ / २०२४ दि. २२/०७/२०२४ चे पत्र

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रास अनुसरूण आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे अनुभव देवून त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता (Employability) वाढविण्यासाठी संदर्भाकीत शासन निर्णयान्वये "मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना" सन २०२४-२५ या आर्थिक वर्षापासून सूरू करण्यात आली आहे.

तेंव्हा संदर्भिय शासन निर्णयानुसार महाविद्यालयामधील आवश्यक मनुष्यबळाची मागणी सोबत जोडलेल्या नमुन्यात तयार करून संबंधीत कार्यालयास पाठविण्यात यावी. ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

डॉ. पी. एस. पांडव
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत:- शासन पत्र जोडले आहे.

महाराष्ट्र शासन
जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,
सी बिल्डींग, शासकीय निवासस्थान, विचारे माळ, कोल्हापूर
Web site- www.mahaswayam
दूरध्वनी:- ०२३१-२५४५६७७
Email - kolhapurrojgar@gmail.com

जा.क्र. ३४१/जिकौविरोवउमाकेंको/मु.यु.का.प्र.योजना/2074 /२०२४ दि.-२२/०७/२०२४

प्रती,

सर्व शासकीय/निमशासकीय आस्थापना/महामंडळे/ स्वराज्य संस्था/
सर्व महाविद्यालये / सर्व खाजगी आस्थापना कोल्हापूर जिल्हा.

Date - 24.07.2024
Inward No 580
T2/EST

विषय:- "मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या" अंमलबजावणीबाबत .....
संदर्भ :- शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२४/प्र.क्र.९०/व्यशि, दिनांक ०९/०७/२०२४

राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे अनुभव देवून त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता (Employability) वाढविण्यासाठी संदर्भांकित शासन निर्णयान्वये **"मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण"** योजना सन २०२४-२५ या आर्थिक वर्षापासून सुरु करण्यांत आली आहे.

या योजनेअंतर्गत सर्व शासकीय / निमशासकीय/महामंडळे / स्वराज्य संस्था / महाविद्यालये / खाजगी आस्थापना तसेच संबंधीत तालुका/जिल्हा/विभाग/राज्यस्तरीय कार्यालये या योजनतंर्गत मनुष्यबळाची मागणी करु शकती. पात्रता धारक रोजगार इच्छूक उमेदवार व आस्थापनांना आवश्यक असणाऱ्या मनुष्यबळाची मागणी यास जोडण्याचे काम विभागाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावरुन करण्यांत येत आहे .

या योजने अंतर्गत खाजगी क्षेत्रातील आस्थापना/उद्योजकाकडे एकुण कार्यरत मनुष्यबळाच्या १०% व सेवा क्षेत्रासाठी २०% एवढे उमेदवार तर केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय/निमशासकीय आस्थापना /उद्योग/महामंडळ या मध्ये मंजूर पदाच्या ५% एवढे उमेदवार कार्य प्रशिक्षणासाठी घेता येतील.

उमेदवाराचा कार्य प्रशिक्षण कालावधी हा ६ महिन्याचा राहील या कालावधीत उमेदवाराला त्याच्या शैक्षणीक अर्हतेनुसार पुढील प्रमाणे १) एच.एस.सी (१२ वी) करिता ६०००- (सहा हजार रुपये) २) आय.टी.आय/पदविका करीता ८०००- (आठ हजार रुपये) ३.) पदवी/पदव्युत्तर करिता १०,०००/- (दहा हजार रुपये) प्रतीमाह विद्यावेतन शासनाद्वारे देण्यात येईल तसेच कार्य प्रशिक्षण कालावधी पूर्ण झाल्यानंतर संबंधित आस्थापना कडून प्रशिक्षण केल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**सर्व प्रथम सर्व शासकीय / निमशासकीय आस्थापना/महामंडळे / स्वराज्य संस्था/ सर्व महाविद्यालये / सर्व खाजगी आस्थापना यांना त्यांचे आस्थापनाची नोंद विभागाचे https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर करणे आवश्यक आहे.**

तरी जिल्ह्यातील शासकीय / निमशासकीय/मंहामंडळे / स्वराज्य संस्था/ महाविद्यालये / खाजगी आस्थापना तसेच संबंधीत तालुका/जिल्हा/विभाग/राज्यस्तरीय कार्यालये त्यांना आवश्यक मनुष्यबळाची मागणी सोबत जोडलेलया नमून्यात जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सी बिल्डिंग, शासकीय निवासस्थान, विचारे माळ, कोल्हापूर या कार्यालयास किंवा कार्यालयाच्या kolhapurrojgar@gmail.com या मेल आय डी वर सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात सादर करावी. **सदर कामास प्रथम प्राधान्य द्यावे.**

सहपत्र - पुढील प्रमाणे

Shivaji University, Kolhapur
Affiliation/T-
Inward No 5561
Date 24/07/2024

T-4/EST

अमोल येडगे (भाप्रसे)
जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

प्रतिलीपी - मा. आयुक्त, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, आयु., नवी मुंबई यांना माहितीस्तव

# " मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना "

अंतर्गत (शासकीय/निमशासकीय/महामंडळे यांचे करिता)

( Government Sector)

## अधिसूचित पदांची माहिती

जिल्हा - कोल्हापूर

| अ. क्र | कार्यालयाचे नाव व पत्ता | कार्यालय प्रमुखाचे नाव व पदनाम | कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक व मोबाईल क्रमांक | कार्यालयाचा ईमेल आयडी | आस्थापनाचा प्रकार (शासकीय/ निमशासकीय) | एकूण मंजूर पदे (संख्या) | एकूण कार्यरत पदे (संख्या) | शा.नि.संकीर्ण,२०२४/प्र.क्र९०/ व्यशि-३, दि.०९/०७/२०२४ नुसार मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेसाठी अधिसूचित केलेली/ येणारी पदे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

टिप :- स्तंभ ( कॉलम) क्रमांक ९ ची माहिती भरत्ताना खालील बाबींचे अवलोकन करावे.

१. शासकीय/निमशासकीय/महामंडळे यांना मंजूर पदाच्या ५ % एवढे उमेदवार " मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना " योजनेअंतर्गत कार्य प्रशिक्षणासाठी घेता येईल. त्यामुळे कार्यालयातील मंजूर पदांच्या ५ % एवढी संख्या स्तंभ ( कॉलम) क्रमांक ९ मध्ये दर्शवावी.

कार्यालय प्रमुखाची सही व शिक्का

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या अंमलबजावणीस मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२४/प्र.क्र.९०/व्यशि-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : ०९ जुलै, २०२४

**वाचा :-**

१) रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम योजना बाबतचा नियोजन विभागाचा शासन निर्णय क्र. EMP-१०७४/P-४, Secretariate, Mumbai-३२, Dated ३rd December, १९७४.
२) रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम योजना बाबतचा नियोजन विभागाचा शासन निर्णय क्र. EMP-१०७४/५६७८/P-४, Secretariate, Mumbai-३२, Dated १४th February, १९७५.
३) रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम योजना विद्या वेतनात वाढ बाबतचा उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभागाचा शासन निर्णय क्र.ईपीपी /१०८८/३५९/सेयो-१, दि. २१ मार्च १९९५.

**प्रस्तावना :-**

राज्यामध्ये युवक वर्ग आपले शिक्षण पुर्ण करून दरवर्षी मोठ्या संख्येने नोकरी, व्यवसाय यांच्या शोधात बाहेर पडत आहे. अशा बहुतांश युवकांना व्यवसाय व नोकरी संबंधित अनुभवाचा अभाव असल्याने व्यवसाय सुरु करणे अथवा नोकरी प्राप्त करण्यामध्ये अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे दिसून येत आहे. या समस्येमुळे युवक वर्गामध्ये बेरोजगारीचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यासाठी अडचणी येत आहेत. विशेषतः यामध्ये १२ वी पास, विविध ट्रेड मधील आय.टी.आय., पदविकाधारक, पदवी आणि पदव्युत्तर युवकांचा समावेश आहे. सद्यस्थितीत राज्यातील अनेक उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगाराची संधी उपलब्ध असली तरी असे उद्योग व बेरोजगार युवक यांना साधणारा दुव्यांचा अभाव असल्याकारणाने युवकांना शिक्षणानंतर अनुभवा अभावी पूर्णवेळ रोजगार मिळणे कठीण होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

महाराष्ट्र शासनामार्फत "रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम" ही योजना दि.३ डिसेंबर, १९७४ पासून राबविण्यात येत होती. सदर योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी व योजनेचा लाभ अधिकाधिक उमेदवारांना व्हावा यासाठी कालानुरूप सदर योजनेत सुधारणा करणे आवश्यक होते. त्यामुळे उमेदवारांना रोजगाराच्या अधिकाअधिक संधी उपलब्ध व्हाव्यात याकरीता सदर योजना सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय -:

राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देवून त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता (Employability) वाढविण्यासाठी "मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना" सन २०२४-२५ या आर्थिक वर्षापासून सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

### १. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचे स्वरूप:

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जन-कल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे **मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना** राबवली जाणार आहे. या उपक्रमांतर्गत तयार केलेल्या संकेतस्थळाच्या माध्यमातून रोजगार इच्छुक उमेदवार आणि रोजगार उपलब्ध करून देणारे उद्योजक जोडले जातील. रोजगार इच्छुक उमेदवारांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव प्रशिक्षणातून मिळून त्यांची क्षमतावाढ होईल तसेच उद्योजकांना त्यांच्या उद्योगासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ कार्य प्रशिक्षण योजनेद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल. रोजगार इच्छुक उमेदवार आणि प्रशिक्षण देऊ इच्छिणारे उद्योजक विभागाचे संकेतस्थळावर सुलभतेने नोंदणी करतील.

१.१ या उपक्रमाअंतर्गत या योजनेकरिता विभागाच्या संकेतस्थळावर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. योजनेचे कामकाज उदा. उमेदवारांची नोंदणी, आस्थापनांची नोंदणी, कार्यप्रशिक्षण व्यवसाय नोंदणी, उपस्थिती नोंदविणे, विद्यावेतन अदा करणे, प्रशिक्षण रुजू व समाप्ती अहवाल, अनुभव प्रमाणपत्र इ. बाबी ऑनलाईन पद्धतीने करण्यात येतील. यासाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्याची जबाबदारी आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यांची राहील.

१.२ बारावी, आय.टी.आय., पदविका, पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता धारण केलेले रोजगार इच्छुक उमेदवार ऑनलाईन नोंदणी करतील.

१.३ लघु आणि मध्यम (SMEs) व मोठे उद्योग, स्टार्टअप्स, सहकारी संस्था, शासकीय, निमशासकीय आस्थापना/महामंडळ, सामाजिक संस्था (कंपनी कायदा, २०१३ मधील सेक्शन ८) आणि विविध आस्थापना इ. यांना आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची मागणी विभागाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने नोंदवतील. किमान २० रोजगार देणाऱ्या आस्थापना या कार्यप्रशिक्षणासाठी सहभागी होण्यासाठी पात्र असतील. या आस्थापना/उद्योगामध्ये सध्याच्या मनुष्यबळावर आधारित सुमारे १० लाख कार्य प्रशिक्षणच्या संधी प्रत्येक आर्थिक

वर्षात या योजनेच्या माध्यमातून उपलब्ध होतील. या योजनेंतर्गत पात्र आस्थापना/ उद्योग यांची यादी **परीशिष्ट-अ** मध्ये नमूद आहे.

१.४ शासकीय / निमशासकीय आस्थापना / उद्योग / महामंडळाची सबंधित तालुका /जिल्हा/विभाग/ राज्यस्तरीय कार्यालये या योजनेंतर्गत मनुष्यबळाची मागणी करू शकतील.

१.५ रोजगार इच्छुक उमेदवारांची पात्रता व उद्योगाची कुशल मनुष्यबळाची मागणी यास जोडण्याचे काम विभागाचे संकेतस्थळ करेल.

२. सदर योजनेकरीता उमेदवाराची पात्रता खालिलप्रमाणे असेल :

२.१ उमेदवाराचे किमान वय १८ व कमाल ३५ वर्ष असावे.

२.२ उमेदवाराची किमान शैक्षणिक पात्रता १२वी पास/ आयटीआय/ पदविका/ पदवी/ पदव्युत्तर असावी. मात्र शिक्षण चालू असलेले उमेदवार या योजनेत सहभागास पात्र असणार नाहीत.

२.३ उमेदवार हा महाराष्ट्राचा अधिवासी असावा.

२.४ उमेदवाराची आधार नोंदणी असावी.

२.५ उमेदवाराचे बँक खाते आधार संलग्न असावे.

२.६ उमेदवाराने कौशल्य, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर नोंदणी करुन रोजगार नोंदणी क्रमांक प्राप्त केलेला असावा.

३. सदर योजनेकरीता आस्थापना/उद्योगासाठीची पात्रता खालिलप्रमाणे असेल :-

३.१ आस्थापना / उद्योग महाराष्ट्र राज्यात कार्यरत असावा.

३.२ आस्थापना / उद्योगाने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असावी.

३.३ आस्थापना / उद्योगाची स्थापना किमान ३ वर्ष पूर्वीची असावी.

३.४ आस्थापना/उद्योगांनी EPF, ESIC, GST,Certificate of incorporation, DPIT व उद्योग आधार ची नोंदणी केलेली असावी.

४. या योजनेअंतर्गत राज्यातील उद्योगांमध्ये रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी खालीलप्रमाणे कार्य प्रशिक्षण कार्यक्रम राबवला जाईल व त्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे निश्चित केले आहे.

४.१ या योजनेत सहभागी होण्यासाठी उमेदवाराने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या या योजनेसाठीच्या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे.

४.२ आस्थापना/उद्योग/महामंडळामार्फत विना अनुभवी रोजगार इच्छुक पात्र उमेदवारांना आस्थापना/उद्योग/ महामंडळ या मध्ये प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षण देण्यात येईल. या योजनेंतर्गत उमेदवारांना प्रशिक्षण कालावधीत कार्य प्रशिक्षणाद्वारे कुशल/अर्धकुशल प्रकारचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देणे अपेक्षित आहे.

४.३ सदर कार्य प्रशिक्षणचा कालावधी ६ महिने असेल. सदरच्या सहा महिन्याच्या कालावधीसाठी उमेदवारांना या योजनेंतर्गत शासनामार्फत विद्यावेतन देण्यात येईल.

४.४ प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना संबंधित आस्थापनेकडून प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्याचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र देण्यात येईल.

४.५ या योजनेच्या प्रशिक्षणा नंतर प्रशिक्षण पूर्ण केलेले उमेदवार सबंधित उद्योग/ आस्थापना यांना योग्य वाटल्यास व उमेदवाराची इच्छुकता असल्यास त्यांना रोजगार देण्याच्या दृष्टीने संबंधित आस्थापना निर्णय घेऊ शकतील.

४.६ या योजनेंतर्गत प्रशिक्षण घेत असलेल्या उमेदवारांना किमान वेतन कायदा, राज्य कामगार विमा कायदा, कामगार भविष्य निर्वाह निधी कायदा, कामगार नुकसान भरपाई कायदा व औद्योगिक विवाद कायदा लागू राहणार नाही.

४.७ या कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे शासनामार्फत विद्यावेतन दिले जाईल. सदर विद्यावेतनाचे विवरण खालील प्रमाणे असेल.

| **अ.क्र.** | **शैक्षणिक अर्हता** | प्रतिमाह विद्यावेतन रु. |
|---|---|---|
| १. | १२ वी पास | रु. ६,०००/- |
| २. | आय.टी.आय/ पदविका | रु. ८,०००/- |
| ३. | पदवीधर/ पदव्युत्तर | रु. १०,०००/- |

४.८ या योजनेंतर्गत उपरोक्त तक्त्यात नमूद दरमहा विद्यावेतन रक्कम शासनाद्वारे प्रशिक्षणार्थ्यांना अदा करण्यात येईल. प्रशिक्षणा दरम्यान प्रशिक्षणार्थीची दैनिक हजेरी संबंधित आस्थापना/उद्योग ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येईल. सदर ऑनलाईन उपस्थितीच्या आधारे प्रशिक्षणार्थीचे विद्यावेतन प्रशिक्षणार्थीच्या थेट बँक खात्यात (DBT) ऑनलाईन पद्धतीने दरमहा अदा करण्यात येईल.

४.९ विद्यावेतनामध्ये सबंधित उद्योजकामार्फत जाहीर केलेली सुट्टी व अनुज्ञेय रजा याचा अंतर्भाव राहील. उद्योजक उमेदवारांना सदर विद्यावेतना व्यतिरिक्त

अधिकचे विद्यावेतन देऊ इच्छित असेल तर सदरची वाढीव रक्कम उमेदवारांना अतिरिक्त स्वरुपात देऊ शकेल.

४.१० या योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थी महिन्यातून १० दिवस अथवा त्यापेक्षा जास्त दिवस गैरहजर असला तर, सबंधित प्रशिक्षणार्थीस त्या महिन्याचे विद्यावेतन अनुज्ञेय राहणार नाही.

४.११ प्रशिक्षणार्थीने वरील अटीची पूर्तता केली असली परंतु सदर प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणाच्या पहिल्याच महिन्यात प्रशिक्षण सोडून गेल्यास असा प्रशिक्षणार्थी विद्यावेतनास पात्र राहणार नाही.

४.१२ या योजनेचा दर २ वर्षांनी आढावा घेऊन आवश्यकता असल्यास योजनेत सुधारणा करणेबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

४.१३ या योजनेच्या दरम्यान प्रशिक्षणार्थीस कायम / नियमित स्वरूपाचा रोजगार अथवा स्वयंरोजगार प्राप्त झाल्यास अथवा प्रशिक्षण सोडून गेल्यास अथवा अनधिकृत गैरहजर राहिल्यास या योजनेंतर्गत प्रशिक्षण व त्या अनुषंगाने विद्यावेतन घेण्यासाठी पात्र राहणार नाही.

४.१४ या योजनेंतर्गत शिकाऊ उमेदवारी (NAPS /MAPS) पूर्ण केलेले व करीत असलेले उमेदवार पात्र राहणार नाहीत.

४.१५ एका उमेदवारास या योजनेचा लाभ एकदाच घेता येईल.

४.१६ या योजनेंतर्गत खाजगी क्षेत्रातील आस्थापना/उद्योजकाकडे एकूण कार्यरत मनुष्यबळाच्या १०% व सेवा क्षेत्रासाठी २०% इतके उमेदवार कार्य प्रशिक्षणसाठी घेता येतील. केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय/ निमशासकीय या आस्थापना/ उद्योग/ महामंडळ या मध्ये मंजूर पदाच्या ५% इतके उमेदवार कार्यप्रशिक्षणासाठी घेता येतील. आस्थापना/ उद्योग यांनी त्यांच्याकडील कार्यरत मनुष्यबळाची माहिती अचूक दर्शविणे आवश्यक राहील. चुकीची मनुष्यबळ संख्या दर्शवून अथवा चुकीच्या पद्धतीने गणना करून या योजनेंतर्गत मनुष्यबळ उपलब्ध करून घेतल्यास त्यासाठी सबंधित कार्यालयाचा कार्यालय प्रमुख/ प्राधिकृत अधिकारी जबाबदार राहील.

४.१७ राज्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० - (NEP-२०२०) अंतर्गत नवीन अभ्यासक्रम आराखडयाची अंमलबजावणी सर्व स्वायत्त महाविद्यालये आणि विद्यापीठ विभागातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी सुरु करण्यात आली आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन अभ्यासक्रम आराखडा राज्यातील अकृषी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांनाही लागू करण्यात आला आहे. नवीन अभ्यासक्रम

आराखडयांतर्गत एकूण ६ व्हर्टीकल्स पैकी ५ व्या आणि ६ व्या व्हर्टिकल्समध्ये कौशल्य आधारीत अभ्यासक्रम, ऑन जॉब ट्रेनिंग (OJT) आणि Apprenticeship या नावीन्यपूर्ण अभ्यासक्रमाचाही समावेश करण्यात आला आहे. युवकांना कौशल्यपूर्ण प्रशिक्षण, सॉफ्टस्किल ट्रेनिंग, लाईफस्किल ट्रेनिंग, तांत्रिक प्रशिक्षण देवून तरुणांची रोजगारक्षमता वाढविणे तसेच शिक्षण घेतांना कामाच्या ठिकाणी कामाशी संबंधित कार्यकौशल्य आत्मसात करणे या उद्देशाने ज्या अभ्यासक्रमात कमीत कमी ६ महिन्यांचा ऑन जॉब ट्रेनिंग (OJT) किंवा Apprenticeship अंतर्भूत आहे, अशा अभ्यासक्रमांतील विद्यार्थीदेखील मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेसाठी पात्र ठरतील.

५. या योजनेचे नियमित संनियंत्रण व आढावा खालीलप्रमाणे घेण्यात येईल.

५.१ या योजनेसाठी "राज्यस्तरीय सनियंत्रण समिती" स्थापन करण्यात येत आहे. सदर समिती योजनेचा आढावा तसेच योजनेमध्ये धोरणात्मक सुधारणा/बदल बाबतचा निर्णय घेईल. समितीची बैठक दर ४ महिन्यांनी अथवा आवश्यकतेनुसार घेण्यात येईल. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | पदनाम | समितील पदनाम |
|---|---|---|
| १ | मा.मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, उद्योग व कामगार, उच्च व तंत्र शिक्षण, वित्त विभाग, सामजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, बहुजन कल्याण विभाग, अल्पसंख्यांक विभाग, आदिवासी विकास विभाग, नगर विकास विभाग, ग्राम विकास विभाग, महिला व बाल विकास विभाग, माहिती व जनसंपर्क विभाग, माहिती तंत्रज्ञान विभाग | सदस्य |
| ३ | महासंचालक, महाराष्ट्र राज्य कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे | सदस्य |
| ४ | नामांकित उद्योग क्षेत्रातील एकूण चार प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई | सदस्य |
| ६ | संचालक, उच्चशिक्षण संचालनालय, पुणे | सदस्य |
| ७ | संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई | सदस्य |
| ८ | क्षेत्रीय संचालक, कौशल्य विकास व उद्योजकता महासंचालनालय, भारत सरकार, मुंबई | सदस्य |
| ९ | संचालक, बोर्ड ऑफ ॲप्रेंटिसशिप ॲड ट्रेनिंग, वेस्टर्न रिजन, मुंबई | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| १० | औद्योगिक संघटनाचे प्रतिनिधी (उदा. ASSOCHAM, CREDAI, CII, FICCI, MCCI, NASSCOM, PHDCCI इ.) | सदस्य |
| ११ | मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष प्रतिनिधी | सदस्य |
| १२ | संचालक, राष्ट्रीय शिकाऊ प्रोत्साहन योजना (एन.ए.पी.एस.) | सदस्य |
| १३ | संचालक, महाराष्ट्र शिकाऊ प्रोत्साहन योजना (एम.ए.पी.एस.) | सदस्य |
| १४ | आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता | सदस्य सचिव |

५.२ कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचा शासन निर्णय कौविउ-२०२१/प्र.क्र.३८/उद्योजकता (कौ.१), दिनांक १७ जून, २०२२ अन्वये स्थापन केलेली जिल्हास्तरीय **"कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समिती"** या योजनेचा वेळोवेळी आढावा घेईल. तसेच, योजनेसबंधित स्थानिक स्तरावरील अडी-अडचणीचे निराकरण करेल. सदर समितीची बैठक दर महिन्यास घेण्यात येईल.

५.३ या योजनेच्या अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय यांची राहील.

५.४ जिल्हास्तरावर सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता हे या योजनेचे अंमलबजावणी अधिकारी राहतील.

५.५ सदर योजनेच्या संनियंत्रणासाठी लागणारे राज्य व जिल्हास्तरीय मनुष्यबळ ( नोडल अधिकारी व समन्वयक) यांची नियुक्तीबाबत स्वतंत्र मागदर्शक सूचना विभागामार्फत निर्गमित करण्यात येईल.

५.६ योजनेचा लाभ राज्यातील जास्तीत जास्त उमेदवारांना व्हावा याकरिता या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये शासनाच्या विविध विभागांचा सहभाग आवश्यक असल्याने अशा विभागांना सामविष्ट करून विभागनिहाय जबाबदारी **परिशिष्ट-ब** मध्ये नमूद केल्या आहेत.

६. महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांची प्रचार, प्रसिध्दी करणे व जास्तीत जास्त नागरिकांना योजनेचा लाभ पोहचविण्यासाठी **योजनादूत** नेमण्याची घोषणा सन २०२४-२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पीय अधिवेशनात करण्यात आली आहे. त्यानुसार ग्रामीण भागात प्रत्येक ग्रामपंचायतसाठी १ व शहरी भागात ५,००० लोकसंख्येसाठी १ याप्रमाणे एकूण ५०,००० योजनादूत प्रस्तुत योजनेअंतर्गत नेमण्यास मान्यता देण्यात येत आहे. योजनादूतांचे विद्यावेतन या

योजनेमधून अदा करण्यात येईल. याबाबतचे स्वतंत्र आदेश माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांच्यामार्फत निर्गमित करण्यात येतील.

७. शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत **"मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना"** अंमलबजावणी करणे करीता आवश्यक निधी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच योजनेच्या अंमलबजावणीसाठी लागणारा प्रशासकीय खर्च, प्रचार व प्रसिध्दी इत्यादीसाठी एकूण खर्चाच्या ३ % निधी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७.१ या योजनेतील थेट लाभाची रक्कम (DBT) वितरित करण्यासाठी आयुक्त, (कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता) आयुक्तालय यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून नियुक्त करण्यात येत आहे.

७.२ आहरण व संवितरण अधिकारी म्हणून सहाय्यक संचालक ( लेखा ), कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता) आयुक्तालय हे राहतील.

७.३ विद्यावेतनासाठी आवश्यक निधी शासनाकडून प्राप्त करुन घेऊन विहित कालावधीत लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये (DBT) जमा करण्याची जबाबदारी आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यांची राहील.

८. योजनेसाठीचा निधी झेडए-२, २२३०-कामगार व सेवायोजन, ०२ सेवायोजन, ००४ संशोधन, सर्व्हेक्षण व सांख्यिकी, (०१)(०१) सेवायोजन रोजगार उपलब्धता विषयक माहिती व युवक रोजगार विषयक सेवा (२२३० ११०७), ३४ शिष्यवृत्या व विद्यावेतने या लेखाशिर्षाखाली त्या त्या वित्तीय वर्षाकरिता मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीमधून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय मा.मंत्रीमंडळाच्या दि. ०८ जुलै, २०२४ रोजी पार पडलेल्या बैठकीतील निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक - २०२४०७०९१७०१२२३९०३ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRASENJEET KARLEKAR

Digitally signed by PRASENJEET KARLEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SKILL EMPLOYMENT ENTREPRENEURSHIP AND INNOVATION DEPARTMENT,
2.5.4.20=d219c45caa42a6d2c11a62256b2ff3ad939a42cc9fb6fa0cb24e384214bcee0c, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=58B958203D9E7F466AE2AD722C44D2E8950FE2F9D49946 1E1829267 B19AB9CFC, cn=PRASENJEET KARLEKAR
Date: 2024.07.09 17:41:12 +05'30'

(प्रसेनजीत कारलेकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४. मा. मंत्री (सर्व) यांचे खासगी सचिव, मंत्रालय मुंबई-३२

५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
६. अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
७. प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
८. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
९. सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१०. अमुस/प्र.स./सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
११. अमुस/प्र.स./सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१२. अमुस/प्र.स./सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. अमुस/प्र.स./सचिव, बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. अमुस/प्र.स./सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. अमुस/प्र.स./सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. अमुस/प्र.स./सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. अमुस/प्र.स./सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. अमुस/प्र.स./सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. अमुस/प्र.स./सचिव, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई
२०. अमुस/प्र.स./सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
२१. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, मुंबई
२२. निवड नस्ती (व्यशि-३).

## परीशिष्ट-अ

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण या योजनेंतर्गत पात्र आस्थापना /उद्योग याची यादी

| अ.क्र. | आस्थापना / उद्योग | उदाहरण |
|---|---|---|
| १ | खाजगी / सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग | नोंदणीकृत लघु आणि मध्यम (SMEs) व मोठे उद्योग |
| २ | शासकीय/निमशासकीय आस्थापना | केंद्र अथवा राज्य शासन अंतर्गत आस्थापना / महामंडळ |
| ३ | स्टार्टअप्स | DPIT मधील नोंदणीकृत स्टार्टअप्स |
| ४ | सहकारी संस्था | जिल्हा सहकारी बँक, शेड्युल्ड बँक, साखर कारखाने, सुत गिरणी व सहकारी तत्वावरील उद्योग |
| ५ | सामाजिक संस्था | कंपनी कायदा, २०१३ मधील सेक्शन ८ अंतर्गत स्थापन सामाजिक संस्था |
| ६ | सेवा क्षेत्रातील खाजगी/ सार्वजनिक आस्थापना/ कंपन्या / उपक्रम/ संस्था | CA Firm, Law Firm, Media, NBFC, NSE/ BSE, Retail, Insurance, Hospitality, Health, Taxation, Logistics, Tourism etc. |

टीप- सदर यादी अंतिम नसून यामध्ये आवश्यकतेनुसार वाढ करण्यात येईल.

## परिशिष्ट-ब

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेमध्ये सहभाग धारकांची जबाबदारी

| अ.क्र. | सहभाग धारक | जबाबदारी |
|---|---|---|
| १ | मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष, | • योजनेसाठी शासनाच्या विविध विभागांसमवेत मुख्य समन्वयक म्हणून कार्य करणे.<br>• योजनेअंतर्गत नोंदणी, फलनिष्पत्ती इ. माहिती व इतर विभागातील कार्यवाही याबाबत कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागा सोबत समन्वय करून योजने संबंधित माहिती वेळोवेळी मा.मुख्यमंत्री यांना सादर करणे. |
| २ | कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग | • मुख्य सनियंत्रण व समन्वयक विभाग म्हणून योजने संबंधित सर्व प्रकारची प्रशासकीय व वित्तीय बाबी हाताळणे.<br>• योजने संबंधी आवश्यक मंजुरी आदेश निर्गमित करणे / परवानगी देणे<br>• योजनेसाठी आवश्यकतेप्रमाणे निधी उपलब्ध करून देणे<br>• योजनेच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री कार्यालयाशी व इतर विभागासी समन्वय साधणे. |
| ३ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | • विविध विद्यापीठ/ महाविद्यालय/ शैक्षणिक संस्था मधील शिक्षण घेत असलेले अथवा शिक्षण सोडलेले अथवा पूर्ण केलेल्या उमेदवारांना योजनेची माहिती विविध माध्यमाद्वारे प्रसार करणे.<br>• त्यांच्या अधिपत्याखालील शैक्षणिक संस्थेच्या प्लेसमेंट कक्षाच्या संपर्कात असलेल्या उद्योजकांना व इतर आस्थापनाना योजनेमध्ये सहभागी करून त्यांचे कडील रिक्तपदे पोर्टलवर अधिसूचित करून घेणे.<br>• योजनेमध्ये कार्य प्रशिक्षण घेण्यासाठी उमेदवारांना प्रोत्साहन देऊन पाठपुरावा करणे व प्रत्यक्ष रुजू झालेल्या उमेदवारांची माहिती संकलित करणे व वेळोवेळी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयास उपलब्ध करून देणे.<br>• कॉल सेंटर/इतर माध्यमाद्वारे च्या सहायाने उमेदवारांशी संपर्क करून योजनेत सहभागी होण्यास मार्गदर्शन करणे व पोर्टल / ॲपवर उमेदवाराची नोंदणी करून घेणे. |
| ४ | उद्योग विभाग/ उद्योग संचालनालय | • योजनेच्या संकेतस्थळ/ॲपवर नोंदणी करण्याबाबत राज्यातील विविध उद्योजकांना सूचना देणे.<br>• उद्योजकांनी योजनेमध्ये प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षणासाठी रिक्तपदे अधिसूचित करणेसाठी पाठपुरावा करून |

| अ.क्र. | सहभाग धारक | जबाबदारी |
|---|---|---|
| | | व्यवसाय व कार्यानुसार रिक्तपदे संकेतस्थळ/ॲपवर अधिसूचित करून घेणे. |
| ५ | कामगार विभाग | • योजनेच्या संकेतस्थळ/ॲपवर नोंदणी करण्याबाबत राज्यातील विविध उद्योजकांना सूचना देणे.<br>• उद्योजकांनी योजनेमध्ये प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षणासाठी रिक्तपदे अधिसूचित करणेसाठी पाठपुरावा करून व्यवसाय व कार्यानुसार रिक्तपदे संकेतस्थळ/ॲपवर अधिसूचित करून घेणे. |
| ६ | वस्तु व सेवाकर विभाग | • योजनेच्या संकेतस्थळ/ॲपवर नोंदणी करण्याबाबत राज्यातील विभागांतर्गत नोंदणीकृत विविध उद्योग व इतर आस्थापणांना सूचना देणे.<br>• विभागांतर्गत नोंदणीकृत विविध उद्योग व इतर आस्थापणांनी योजनेमध्ये प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षणासाठी रिक्तपदे अधिसूचित करणेसाठी पाठपुरावा करून व्यवसाय व कार्यानुसार रिक्तपदे संकेतस्थळ/ॲपवर अधिसूचित करून घेणे. |
| ७ | सामजिक न्याय विभाग | विभागा अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध कौशल्य विकास योजनेंतर्गत प्रशिक्षित अथवा इच्छुक उमेदवारांशी संपर्क करून योजनेत सहभागी होण्यास प्रोत्साहन देऊन मार्गदर्शन करणे व संकेतस्थळ/ ॲपवर नोंदणी करून घेणे. |
| ८ | आदिवासी विकास विभाग | विभागा अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध कौशल्य विकास योजनेंतर्गत प्रशिक्षित अथवा इच्छुक उमेदवारांशी संपर्क करून योजनेत सहभागी होण्यास प्रोत्साहन देऊन मार्गदर्शन करणे व संकेतस्थळ/ ॲपवर नोंदणी करून घेणे. |
| ९ | बहुजन कल्याण विभाग | विभागा अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध कौशल्य विकास योजनेंतर्गत प्रशिक्षित अथवा इच्छुक उमेदवारांशी संपर्क करून योजनेत सहभागी होण्यास प्रोत्साहन देऊन मार्गदर्शन करणे व संकेतस्थळ/ ॲपवर नोंदणी करून घेणे. |
| १० | अल्पसंख्यांक विभाग | विभागा अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध कौशल्य विकास योजनेंतर्गत प्रशिक्षित अथवा इच्छुक उमेदवारांशी संपर्क करून योजनेत सहभागी होण्यास प्रोत्साहन देऊन मार्गदर्शन करणे व संकेतस्थळ/ ॲपवर नोंदणी करून घेणे. |
| ११ | नगर विकास विभाग | विभागा अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध कौशल्य विकास योजनेंतर्गत प्रशिक्षित अथवा इच्छुक उमेदवारांशी संपर्क करून योजनेत सहभागी होण्यास प्रोत्साहन देऊन मार्गदर्शन करणे व संकेतस्थळ/ ॲपवर नोंदणी करून घेणे. |
| १२ | पर्यावरण विभाग (महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण | • योजनेच्या संकेतस्थळ/ॲपवर नोंदणी करण्याबाबत राज्यातील विविध उद्योजकांना सूचना देणे. |

| अ.क्र. | सहभाग धारक | जबाबदारी |
|---|---|---|
| | मंडळ) | उद्योजकांनी योजनेमध्ये प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षणासाठी रिक्तपदे अधिसूचित करणेसाठी पाठपुरावा करून व्यवसाय व कार्यानुसार रिक्तपदे संकेतस्थळ/ॲपवर अधिसूचित करून घेणे. |
| १३ | ग्रामीण विकास विभाग | विभागा अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध कौशल्य विकास योजनेंतर्गत प्रशिक्षित अथवा इच्छुक उमेदवारांशी संपर्क करून योजनेत सहभागी होण्यास प्रोत्साहन देऊन मार्गदर्शन करणे व संकेतस्थळ/ ॲपवर नोंदणी करून घेणे. |
| १४ | महिला व बाल विकास विभाग | विभागा अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध कौशल्य विकास योजनेंतर्गत प्रशिक्षित अथवा इच्छुक महिला उमेदवारांशी संपर्क करून योजनेत सहभागी होण्यास प्रोत्साहन देऊन मार्गदर्शन करणे व संकेतस्थळ/ ॲपवर नोंदणी करून घेणे. |
| १५ | महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी | महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध कौशल्य विकास योजनेंतर्गत प्रशिक्षित उमेदवारांशी / प्रशिक्षण संस्था यांचेशी संपर्क करून योजनेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे व संकेतस्थळ/ ॲपवर नोंदणी करून घेणे. |
| १६ | महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी | विविध स्टार्टअप योजनेंतर्गत विविध लाभार्थीघटक (Stakeholders) यांना योजनेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे व संकेतस्थळ/ ॲपवर नोंदणी करून घेणे. |
| १७ | कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय | • योजनेची संपूर्ण अंमलबजावणी व नियंत्रण करणे .<br>• योजनेसाठी शासनाच्या विविध विभाग व संचालनालय समवेत मुख्य समन्वयक म्हणून कार्य करणे.<br>• योजनेसाठी संकेतस्थळ व ॲप तयार करणे तसेच त्यांचे वेळोवेळी दुरुस्ती तसेच अद्यावतीकरण करणे.<br>• योजनेसाठी आवश्यक निधीची मागणी करणे .<br>• योजनेसाठी प्राप्त निधी ऑनलाइन पोर्टलच्या माध्यमातून DBT द्वारे पात्र उमेदवारांना विद्यावेतनाचे वाटप करणे .<br>• आवश्यक मंजुरी आदेश निर्गमित करणे / परवानगी देणे<br>• योजनेचे विभाग/जिल्हानिहाय उद्दिष्ट्य निश्चित करून सनियंत्रण करणे.<br>• योजनेद्वारे कार्य प्रशिक्षणासाठी निवड व रुजू झालेल्या उमेदवारांची, नोंदणीकृत उद्योग अस्थापणांची व योजनेच्या फलनिष्पत्तीची माहिती वेळोवेळी शासनास सादर करणे. इ.<br>• योजनेची विविध माध्यमा मार्फत वेळोवेळी राज्यस्तरीय |

| अ.क्र. | सहभाग धारक | जबाबदारी |
|---|---|---|
| | | प्रसार व प्रसिद्धी करणे. |
| १८ | व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय | • योजनेमध्ये उमेदवार प्रत्यक्षात सहभागी होण्यासाठीची आवश्यक कार्यवाही करणे.<br>• योजनेची कार्यक्षमतेने अंमलबजावणी होण्यासाठी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्थेसोबत समन्वय करणे.<br>• योजनेद्वारे निवड झालेल्या उमेदवार प्रत्यक्ष रुजू झाल्याची खात्री करण्याच्या दृष्टीने उद्योजक/ उमेदवार यांचेशी संपर्क करून माहिती घेणे व वेळोवेळी सादर करणे. इ.<br>• कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय सोबत समन्वय ठेवून आवश्यक माहिती वेळोवेळी सादर करणे.<br>• उपरोक्त विषयी अधिनस्त कार्यालयांना आवश्यक सूचना/ आदेश निर्गमित करणे. |
| १९ | तंत्र शिक्षण संचालनालय | • योजनेमध्ये उमेदवार प्रत्यक्षात सहभागी होण्यासाठीची आवश्यक कार्यवाही करणे.<br>• योजनेची कार्यक्षमतेने अंमलबजावणी होण्यासाठी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्थेसोबत समन्वय करणे.<br>• योजनेद्वारे निवड झालेल्या उमेदवार प्रत्यक्ष रुजू झाल्याची खात्री करण्याच्या दृष्टीने उद्योजक/ उमेदवार यांचेशी संपर्क करून माहिती घेणे व वेळोवेळी सादर करणे. इ<br>• कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय सोबत समन्वय ठेवून आवश्यक माहिती वेळोवेळी सादर करणे.<br>• उपरोक्त विषयी अधिनस्त कार्यालयांना आवश्यक सूचना/ आदेश निर्गमित करणे.<br>• या योजनेकरीता विकसित करण्यात येणाऱ्या पोर्टलव्दारे संचालनालयाकडे उपलब्ध असलेल्या लॉगइन मधून प्राप्त होणाऱ्या उद्योजक व उमेदवार यांच्या माहितीचे संकलन करणे व संबंधितांना सादर करणे<br>• उल्लेखित जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी विभागीय सहसंचालक, उच्च/तंत्र शिक्षण यांचे नियंत्रणाखाली |

| अ.क्र. | सहभाग धारक | जबाबदारी |
|---|---|---|
| | | प्रत्येक विभागामध्ये प्राचार्य/प्राध्यापक /सहयोगी प्राध्यापक दर्जाच्या एक नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येईल |
| २० | उच्च शिक्षण संचालनालय | • योजनेमध्ये उमेदवार प्रत्यक्षात सहभागी होण्यासाठीची आवश्यक कार्यवाही करणे.<br>• योजनेची कार्यक्षमपने अमलबजावणी होण्यासाठी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शेक्षणिक संस्थेसोबत समन्वय करणे.<br>• योजनेद्वारे निवड झालेल्या उमेदवार प्रत्यक्ष रुजू झाल्याची खात्री करण्याच्या दृष्टीने उद्योजक/ उमेदवार यांचेशी संपर्क करून माहिती घेणे व वेळोवेळी सादर करणे. इ<br>• कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय सोबत समन्वय ठेवून आवश्यक माहिती वेळोवेळी सादर करणे.<br>• उपरोक्त विषयी अधिनस्त कार्यालयांना आवश्यक सूचना/ आदेश निर्गमित करणे.<br>• उल्लेखित जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी विभागीय सहसंचालक, उच्च/तंत्र शिक्षण यांचे नियंत्रणाखाली प्रत्येक विभागामध्ये प्राचार्य/प्राध्यापक /सहयोगी प्राध्यापक दर्जाच्या एक नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येईल |
| २१ | जिल्हाधिकारी | • कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समितीचे अध्यक्ष या नात्याने योजनेचा वेळोवेळी आढावा घेऊन योजनेची जिल्हास्तरावर सनियंत्रण करणे.<br>• योजनेसाठी दिलेल्या उद्दिष्टाप्रमाणे जिल्ह्यातील जास्तीत जास्त नियोक्ते/उद्योजक नोंदणी करून उद्दिष्टाप्रमाणे त्यांचे कडील रिक्तपदे अधिसूचित करणे.<br>• यासाठी सबंधित सहभागधारक यांचे समवेत विविध माध्यमाद्वारे संपर्क करणे.<br>• या योजनेंतर्गत कार्य प्रशिक्षणासाठी जिल्हातील जास्तीत जास्त नियोक्ते/ उद्योजक इ. यांची संकेतस्थळ/ ॲपवर नोंदणी करून तसेच त्यांचे कडील कार्य प्रशिक्षणासाठीची रिक्तपदे या योजनेंतर्गत अधिसूचित करून घेतील अशी कार्यवाही करणे.<br>• कार्य प्रशिक्षणासाठी जिल्हातील सर्व शैक्षणिक संस्थानी |

| अ.क्र. | सहभाग धारक | जबाबदारी |
|---|---|---|
| | | योजनेत सहभागी होणेबाबत सर्व सबंधित अधिकारी व संस्था प्रमुखांना सूचना देणे.<br>• योजनेचा वेळोवेळी जिल्हास्तरीय आढावा घेणे.<br>• सोशल / प्रिंट / दृकश्राव्य इ. मिडीयावर योजनेच्या प्रसिद्धीसाठी तयार करावयाचे साहित्य इ. बाबी निश्चित करण्यासाठी शासनाच्या प्रचलीत नियम / सुचना प्रमाणे विहित पद्धतीचा अवलंब करून उपलब्ध करून घेणे व वेळोवेळी योजनेची जिल्हास्तरावर प्रसिद्धी करणे.<br>• कार्य प्रशिक्षणासाठी निवड व रुजू झालेल्या उमेदवारांची जिल्हास्तरीय माहिती संकलित करून पोर्टलवर अपलोड करणे बाबत सर्व संबंधित जिल्हा स्तरीय यंत्रणेला सूचना करणे व शासनास व कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयास वेळोवेळी अहवाल सादर करणे.<br>• उद्योजकांना प्रोत्साहन देण्याकरिता सर्वात जास्त कार्य प्रशिक्षणाअंतर्गत रिक्तपदे अधिसूचित करणारे तसेच, जास्तीत जास्त रोजगार उपलब्ध करून दिलेले उद्योजक/ यांचा सन्मान करणे. |
| २२ | नियोक्ते/ उद्योजक व प्लेसमेंट एजन्सीज, इंडस्ट्री असोसिएशन | • या योजनेअंतर्गत संकेतस्थळ/ॲपवर नोंदणी करणे.<br>• कार्य प्रशिक्षण अंतर्गत व्यवसाय व कार्यक्षेत्र निहाय रिक्तपदे अधिसूचित करणे व उमेदवार रुजू करून घेऊन योजनेमध्ये सहभागी होणे.<br>• अधिसूचित रिक्तपदानुरूप पात्र उमेदवार योजनेमध्ये सहभागी होतील अशी कार्यवाही करणे<br>• या योजनेअंतर्गत सर्व संबंधित शासकीय यंत्रणा व अधिकारी सोबत समन्वय करून आवश्यक माहिती वेळोवेळी सादर करणे. |

टिप :-

१. वरील जबाबदाऱ्या ह्या सूचक असून सहभागधारकांच्या जबाबदाऱ्यामध्ये वाढ / बदल होऊ शकतो. तसेच काही भागधारकांचा समावेश कमी अधिक होऊ शकेल.

२. उपरोक्त नमूद सर्व सूचना /कामे ही सूचक असून परिपूर्ण असतीलच असे नाही. त्यामुळे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी व फलनिष्पत्ती व्हावी यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करावी.